दि. १९/०८/२०२३

**प्रसिध्दी पत्रक**

आरोपी श्री. राहुल सांडू भगत, व्यवसाय-वकील, रा. रवी निवास, नारळीबाग औरंगाबाद यांनी तक्रारदार यांच्याकडे लाचेची रक्कम 50,000/- रुपये मागणी केली व तक्रारदार यांचे वर संशय आल्याने खाजगी ईसम यांनी लाचेची रक्कम स्विकारली नाही .

| | | |
|---|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | :- | औरंगाबाद |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | :- | पोलीस ठाणे अंबड, जिल्हा जालना दाखल गुरनं. 645/23 कलम 7 (अ) भ्र. प्र. अधिनियम. |
| आरोपी यांचे नाव व पत्ता | :- | श्री. राहुल सांडू भगत, व्यवसाय-वकील, रा. रवी निवास, नारळीबाग औरंगाबाद (खाजगी ईसम) |
| लाच मागणी रक्कम | :- | 50,000/-रुपये. तडजोडी अंती ठरलेली रक्कम- 30,000/- रुपये. |
| सापळा अधिकारी | :- | श्रीमती संगीता पाटील, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार यांचे विरुध्द दाखल असलेल्या गुन्हयात मदत करण्यासाठी. |
| थोडक्यात माहिती | :- | यातील तक्रारदार यांचे विरुध्द पोलीस ठाणे अंबड, जिल्हा जालना येथे कलम 498 (अ) प्रमाणे गुन्हा दाखल आहे. दाखल गुन्हयाचे तपास अधिकारी हे माझ्या परिचयाचे आहेत त्यांना प्रोत्साहन देऊन त्यांचेवर प्रभाव टाकुन तपास अधिकारी यांनी तुमच्या विरुध्द दाखल गुन्हयामध्ये तुमच्या पत्नीचा पुरवणी जबाब न नोंदविण्यासाठी व गुन्हयाचे तपासामध्ये सहकार्य करण्यासाठी श्री. राहुल भगत, वकील (खाजगी ईसम) यांनी तक्रारदार यांना 50,000/-रु. लाचेची मागणी करीत असल्याने तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग औरंगाबाद या कार्यालयात तक्रार दिली.<br>फिर्यादी यांचे तक्रारीवरुन दि.11/08/2023 रोजी पंचासमक्ष केलेल्या पडताळणी दरम्यान खाजगी ईसम श्री. राहुल भगत यांनी फिर्यादी यांना तडजोडी अंती 30,000/- रुपये. लाचेची मागणी करुन स्विकारण्याचे मान्य केले बाबत निष्पन्न झाले.<br>त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद तर्फे दि. 12/08/2023 रोजी सापळा आयोजीत केला असता, राहुल भगत यांना तक्रारदाराची शंका आल्याने लाचेची रक्कम स्विकारली नाही. त्यांचे विरुध्द पोलीस स्टेशन अंबड, जिल्हा जालना येथे तक्रारदार यांचे फिर्यादवरुन गुरनं. 645/23 कलम 7 (अ) भ्र. प्र. अधिनियम अन्वये लाचमागणीचा गुन्हा दाखल केला आहे. |

सदर कारवाई पोलीस अधीक्षक मा.संदिप आटोळे, अपर पोलीस अधीक्षक मा. विशाल खांबे, पोलीस उप अधीक्षक राजीव तळेवर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उप अधीक्षक श्रीमती संगीता पाटील यांनी केली आहे. त्यांना सदर कारवाई कामी पोलीस अंमलदार अशोक नागरगोजे, विलास चव्हाण, चालक चांगदेव बागुल यांनी मदत केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधावा.


संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद

ई- मेल :- sp1acbaurangabad@gmail.com. 2) dyspacbabad@gmail.com

ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net संपर्क क्रं. :- 0240-2344050, टोल फ्रि क्रं. 1064,

पोलीस अधीक्षक :- 9923023361 अपर पोलीस अधीक्षक :- 8788644994

पोलीस उप अधीक्षक :- 8668752530


पोलीस उप अधिक्षक कार्यालय ॲन्टी करप्शन ब्युरो औरंगाबाद

( राजीव तळेकर )

पोलीस उप अधिक्षक,

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,

औरंगाबाद.